# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २६/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मोरगाव शिवार येथे दि. २२/०७/२२ चे १५.०० वा. ते दि. २३/०७/२२ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— काशीराम गोविंदा वंजारी वय ४६ वर्ष, रा. धर्मापुरी ता.मौदा जि.नागपुर याने ठेक्याने केलेल्या शेतातील बोर मध्ये लावलेली १ एच.पी. ची मोटर पंप कि. ६,५००/—रु. ची अज्ञात आरोपीने चोरी करुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेंद्र पुडके मो.नं. ९८२३३३११६२ हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक २५/०७/२०२२ रोजी ०४.०० वा. ते ०४.४० वा. दरम्यान अंबीका बार सावनेर ते कळमेश्वर जाणारे रोडवर सावनेर येथे एमएच— ४०/बीजी— ७३१५ क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी क्र. १. रामदयाल राधेलाल वाघाडे, वय ४३ वर्ष, रा. मच्छी मार्केट, वार्ड क्र. ६ कोराडी, आरोपी क्र. २. क्लिनर नामे— रुपेश मोहन पाटील वय २० वर्ष रा. रामपुरी ता. सावनेर यांनी टिप्पर मालक नामे— अभिषेक गोंडाने रा. नागपूर याच्या सांगण्यावरून त्यांच्या ताब्यातील टिप्पर मध्ये बेकायदेशीर रित्या विना परवाना शासनाचा कर चुकवून अवैधरित्या गौण खनिज ६ ब्रास (रेती) ची कि. ६३,६००/—रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण १५,६३,६००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक दिनेश गाडगे पोस्टे सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री नागवे मो.नं. ७६६६९७९८६५ हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बाजार चौक कसाई मोहल्ला सावनेर येथे दि. १३/०७/२२ चे २२.०० वा. ते दि. १४/०७/२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— इमरान मेहबुब शेख वय ३२ वर्ष रा. बाजार चौक, कसाई मोहल्ला वार्ड क्र. ११ सावनेर हे चिकनची दुकान बंद करुन स्वताची एम. एच— ४०/बीयु— ८२५४ क्रमांकाच्या ॲक्टीवा ५ जी मोपेडने स्वताचे घरासमोर उभी करुन घरीच झोपले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमंत ७,०००/—रु. ची मोपेड गाडी चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत तहसील कार्यालय नरखेड येथे दि. २१/०७/२२ चे १३.३० वा. ते १३.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– जाकीर नवाब गजफ्फर खॅा, रा. नरखेड यांनी तहसील कार्यालय नरखेड समोर मोटरसाईकल लावुन कामानितीत्य अंदर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ३७,५००/–रू.ची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार डोंगरदिवे मो.न. ८८०५०४५१०७ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सातगाव रेल्वे उडाण पुला येथे दिनांक २४/०७/२२ चे २०.०० वा. ते २०.२० वा. सुमारास एमएच– ४९/बीडी– ४९१७ क्रमांकाच्या होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोपेड गाडीचा चालक रोहीत शरद शंभरकर(मृतक) वय २४ वर्ष रा. शांतीनगर गार्डन जवळ, नागपुर हा त्याचे मोपेड गाडीचे मागे प्रतीक्षा हरीचंद्र गायकवाड(मृतक), वय २२ वर्ष, रा. शांतीनगर गार्डन जवळ, नागपुर हिला बसुन नागपुर वरून उमरेड कडे स्टेट हायवे क्र ३५३ डी नागपुर ते उमरेड बाजुने जात असतांना मौजा उदासा ते डब्लु सी एल स्टेट हायवे रोडवर आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अचानक गाडी स्लीप झाल्याने तो गंभीर जखमी होउन स्वत: व मागे बसनारी कु प्रतिक्षा हिचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सैयद अशफाक अली वय ३४ वर्ष, रा. हनुमान नगर डोंगरगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री राकेश साखरकर मो.नं. ७३५०९२१०० हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. कोंढाळी :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा कामठी मासोद येथे दि. २४/०७/२२ चे १८.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ.रिता अक्षय किनेकर वय २६ वर्ष, रा.कामठी मासोद हि आपले घरी मुलाला जेवन भरवत असता आरोपी नामे– अक्षय वासुदेव किनेकर वय २६ वर्ष रा.मासोद कामठी, पतीस शरीर सुखाच्या मागनीस नकार दिल्याचे कारणावरून आरोपी पतीने रागाच्या भरात शिवीगाळ करून त्याच्या हातात असलेली पिवळया रंगाच्या नायलोन दारीने फिर्यादीचा गळा दाबन्याचा प्रयत्न करून क्रुंर वागणुक दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३२४, ५०४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री अजित कदम हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ४३ कि.मी. मौजा घाटपेंढरी येथे दिनांक १५/०७/२०२२ चे २२.३० वा. ते दिनांक १५/०७/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान **शिवम रविकुमार अडमाची(मृतक), वय ०३ वर्ष रा.घाटपेंढरी ता. पारशिवनी** हा आपल्या घरासमोर खेळत असता अचानक घराचे बाजुला पाण्याने भरलेल्या गड्यात पडुन त्यास गड्डा बाहेर काढुन लगेच हॉस्पीटल बिछुवा येथे उपचाराकरीता घेवुन गेले असता तेथिल डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. पो.स्टे. बिछवा जि. छिंदवाडा म.प्रदेश येथुन कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविकुमार कृष्णकुमार अडमाची, वय ३३ वर्ष, रा. घाटपेंढरी पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई  हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत महुरे हॉस्पीटल कामठी येथे दिनांक २४/०७/२०२२ चे २२.०० वा. दरम्यान **चक्रधर रामकृश्न बोबडे (मृतक), वय ५२ वर्ष, रा. टेकाडी कन्हान** याने विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाली. उपचाराकामी माहुरे हॉस्पीटल कामठी येथे भरती केले होते. उपचारादरम्यान दि. २५/०७/०२२ चे ००.४५ वा. डॉक्टरांनी मृत घोशीत केले. तरी सदर मर्ग ००/०२२ कलम १७४ जाफौ ची डायरी पोशी रमेश बंजारा पो.स्टे.जुनी कामठी यांनी पो.स्टे. कन्हान येथे आणुन दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हिमांशु चक्रधर बोबडे, वय २१ वर्ष, रा. टेकाडी कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रशांत रंगारी मो.नं. ९५६१०८३९३७ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. बुटीबोरी :–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा बेदुली शिवार येथे दिनांक २५/०७/२०२२ चे १६.०० वा. पुर्वी **सौ सुनिता विलास सिराळ (मृतक), वय ४५ वर्ष रा. बेदुली.ता उमरेड जि.नागपूर** या शौचास गाव नाल्याजवळ गेल्या असता त्यांचा पाय घसरून पडल्याने नाल्यातपडुन मरण पावल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बंटी विलास निराळ, वय २२ वर्ष, बेदुली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस सहायक फौजदार सुरेश धवराळ मो.नं. ९७६५४९७००५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**